
# प्रश्नांचा दिवस

मृणालिनी वनारसे



IAPAR

## लेखिकेविषयी

### मृणालिनी वनारसे

निसर्गशिक्षण, नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि पर्यायी जीवनशैलीचा शोध हे मृणालिनी वनारसे यांच्या कामाचे आणि अभ्यासाचे विषय आहेत. त्यांनी पर्यावरणीय तत्वज्ञान, संस्कृत तसेच भारतीय विद्या (इंडॉलॉजी) या विषयात पारंगत पदवी संपादन केलेली आहे. अनेक वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यातून त्यांनी नियमित लेखन केले आहे. त्यांची आजवर तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत, ज्यात 'प्रतीक' या कादंबरीचा आणि 'आपली भूमी आणि आपण' या पारिस्थितिकी विषयाधारित पुस्तकाचा समावेश होतो. 'आपले अभयारण्य' हे त्यांचे मुलांसाठीचे पुस्तक मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांतून प्रसिद्ध झाले आहे. लहान मुलांबरोबरचे काम हा त्यांचा खास आवडीचा प्रांत आहे. त्या आनंदरंगच्या संस्थापक सदस्या आहेत.

संपर्क : ioraespune@gmail.com

## चित्रकाराविषयी

### मधुरा पेंडसे

मधुरा पेंडसे यांनी अप्लाईड आर्टस्, कॉम्प्युटर आर्टस् व भारतीय विद्या (इंडॉलॉजी) या विषयात शिक्षण घेतले आहे. आनंदरंग उपक्रमात त्या सुरवातीपासून विषयतज्ञ म्हणून सहभागी आहेत. अनेक सामाजिक संस्थांतर्फे त्यांनी जिल्हापरिषदेच्या शाळांमधे मुलांसोबत चित्रकला/दृष्यकला  आस्वादन आणि निर्मिती यासाठी काम केले आहे. लहानमुलांच्या नियतकालिकांमधे आणि राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या पुस्तकांत त्यांच्या चित्रकृती प्रसिद्ध झाल्या आहेत.

संपर्क : madhupendse@gmail.com



# प्रश्नांचा दिवस

लेखन : मृणालिनी वनारसे

चित्रांकन : मधुरा पेंडसे

# प्रश्नांचा दिवस

प्रकाशक
आय.ए.पी.ए.आर.
कलाछाया सांस्कृतिक केंद्र,
पत्रकार नगर, सेनापती बापट रस्त्याजवळ,
पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी : ०२०-२५६७७२२२
इ-मेल : iapar.india@gmail.com

लेखन : मृणालिनी वनारसे
चित्रांकन : मधुरा पेंडसे

© मृणालिनी वनारसे, २०१८


मुद्रक : अमलताश बुक्स, पुणे

पहिली आवृत्ती : ६ मे २०१८

किंमत : रु. १००/-



जूनमधले दिवस होते. शाळा नुकतीच सुरू झाली होती. पावसाचा पत्ता नव्हता. अधूनमधून काळे ढग सूर्याला झाकत होते, त्यामुळं रागावलेला सूर्य ढगांच्या बाहेर आला की अधिकच जोरकस किरणांचा मारा करत होता. साखरीच्या शाळेत प्रार्थनेला जमलेली मुलं सूर्याच्या त्या कडक उन्हानं बेचैन होऊन उगाच चुळबुळ चुळबुळ करत होती. कुणी कुणाचा शर्ट मागून ओढत होतं, कुणी कुणाला टप्पल मारत होतं, मागच्या रांगेत उभ्या असलेल्या मुलांना तर जसं काही खोड्या काढायचं 'लायसन' नुकतंच मिळालं होतं. त्यांच्यावर लक्ष ठेवणारे शिक्षक मधूनमधून 'गप बसा रेऽऽ' असा आवाज काढत होते. असा आवाज आला की जरा वेळ सगळं



शांत आणि मग पुन्हा खोड्या सुरू असा कारभार चालू होता. आठवीतला संकेत ही सगळी मजा बघत आणि शक्यतो चुळबुळ न करण्याचा प्रयत्न करत आपल्या रांगेत उभा होता. त्यालाही कंटाळा आलाच होता. एकदा या आणि एकदा त्या पायावर वजन देत तो




बिचारा उभा होता. डोक्याभोवती घोंघावणाऱ्या चिलटांना वारत, हे सगळं कधी संपतंय असा विचार तो करत होता. हे चिलट आपल्यालाच त्रास देतात, की इतरांनापण देताहेत हे बघण्यासाठी त्यानं वळून इकडंतिकडं पाहिलं. त्याला काही कुठं फारसं दिसेना. शेवटी त्याच्यामागं उभ्या असलेल्या परश्याला तो म्हणाला, परश्या, तुझ्या डोक्यावर आहेत का रे चिलट? लई त्रास देऊन राहिलेत मगापासून. का माझ्याच डोक्यावर आहेत?

परश्या म्हणाला, ‘तुझ्याच डोक्यावर दिसतात लेका. तू तेल लावून आलास का भरपूर? तेलानी येतात म्हणे.’

अस्सं? संकेतला हे ठाऊक नव्हतं. तेल तर त्यानं लावलंच होतं. ‘ते काढणार कसं? भांग विस्कटला म्हणजे? आणि परश्या म्हणतो ते खरं कशावरून?’ संकेत आजूबाजूला बघायला लागला. कुणी कुणी तेल लावलंय, कुणाच्या आजूबाजूला चिलटं घोंघावताहेत हे तो बघत होता. तेवढ्यात आवाज आला, एऽ पुढं बघ रे. चुळबुळ काय लावलीये मघापासनं? आता पुन्हा दिसला नाऽ हालचाल करतानाऽ तर एकदम पुढच्या रांगेत पाठवीन. काय?

सरांचा दरडावणारा आवाज आला, तसा संकेत बिचारा पुतळ्यासारखा स्थिर झाला. त्याला यातलं काही आवडत नव्हतं. ही शाळाही त्याला आवडत नव्हती. त्याच्या गावी फक्त सातवीपर्यंत शाळा होती, म्हणून त्याला या शाळेत पाठवण्यात आलं होतं. सातवीपर्यंतची त्याची शाळा डोंगराच्या पल्याड होती. तिथं त्याचं घर होतं. त्याची माणसं होती. त्याचा गब्रू कुत्रा होता. त्याचं सगळंच तर तिकडं होतं. इथं मामाचं घर होतं. होती





सगळी घरचीच माणसं, पण संकेत मनानं अजून आपल्याच गावी होता. जराशानंही रडू फुटेल अशी भीती त्याला वाटायची. हा डोंगर ओलांडून आपल्या घरी निघून जावं असं त्याला फार वाटत होतं आणि त्यात ही शाळा आणि इथले हे असे शिक्षक... सारखे रागावणारे. काय करावं आणि मन कसं रमवावं त्याला समजत नव्हतं.

शेवटी एकदाचे मुख्याध्यापक आले. प्रार्थना झाली आणि सगळी मुलं आपापल्या वर्गाकडं पळाली. संकेतही जड पावलांनी वर्गात गेला. आता दिवस कसा घालवायचा या कल्पनेनं तो उदास होता, पण त्याला वाटला तेवढा काही त्याचा दिवस वाईट गेला नाही. नवी पुस्तकं, नव्या वह्या, नवे विषय यांच्यात त्याचं मन जरासं रमलं. शेवटचा तास तर ग्रंथालयाचा होता. वर्गाची पुस्तकांची पेटी होती आणि तिच्यातून एकेक पुस्तक एकेका मुलाच्या हाती जात होतं. संकेत उत्सुकतेनं वाट बघत होता. 'आपल्याला कुठलं पुस्तक



मिळेल?' लवकरच त्याच्या हातात पुस्तक आलं आणि तो हरखून गेला. ते पुस्तक चक्क मुंग्यांवरचं होतं. मुंग्या राहतात कशा, खातात काय, करतात काय अशी सगळी माहिती त्यात दिलेली होती आणि मुख्य म्हणजे त्यात चित्रं होती. तुरुतुरु चालणाऱ्या मुंग्यांची, खाऊ घेऊन जाणाऱ्या मुंग्यांची, वारूळ खोदणाऱ्या मुंग्यांची... खूप सारी चित्रं! संकेतला अगदी मजा वाटली. त्याला त्याचं पुस्तक खूप आवडलं. तास संपेपर्यंत तो ते पुस्तक वाचत होता, पुन्हा पुन्हा चाळत होता. तास संपला तेव्हा मोठ्या नाइलाजानं त्यानं ते पुस्तक सरांकडं परत दिलं. शाळा संपवून तो बाहेर आला; तेव्हा त्याला वाटलं की, चला आजचा दिवस तर बरा पार पडला. उद्याचं उद्या.

उद्या उजाडला, तशी कालच्याच दिवसाची पुनरावृत्ती सुरू झाली. पुन्हा प्रार्थनेसाठी रांगा, पुन्हा मुलांच्या खोड्या, पुन्हा एकदा डोळ्यांवर येणारं ऊन. संकेत पुन्हा त्याच्या रांगेत उभा होता. त्याला काही ओरडा खायची इच्छा नव्हती, पण नुसतं शांत तरी कसं उभं राहणार? मधेच त्याला काय आठवलं कुणास ठाऊक. त्याच्यासमोर उभ्या असलेल्या रव्याच्या पाठीला नाक लावून तो

हुंगायला लागला.

मागं उभ्या असलेल्या परश्यानं विचारलं, ‘काय करतोयस रे? काय येडा झाला का?’

संकेत हसायला लागला.

तो परश्याला म्हणाला, ‘अरे मी मुंग्यांसारखं करत होतो. वास येतोय का बघत होतो.’

संकेतचं हे उत्तर ऐकून परश्यापण हसायला लागला.

‘रव्या, बघ हा काय म्हणतोय... तुला वास येतोय....’ परश्यानं संधी सोडली नाही.

रव्या मागं वळून परश्याकडं आणि संकेतकडं बघायला लागला.

संकेत म्हणाला, अरेऽ मी मुंग्यांसारखं करून बघतोय. मुंग्या कशा रांगेनं जातात ना... का जातात माहितीये का? त्यांना पुढच्या मुंगीनं सोडलेला वास येतो... गंध!ऽ मी बघत होतो की, आपण का रांगेत




उभं राहतो? आपल्यालापण येतो का काय वास?

'काहीपण बोलतो का?' रव्या म्हणाला, तुलाच येत असंल वास.

संकेत त्यांना सांगायला लागला, त्यानं काल काय वाचलंय ते. त्याला मुंग्यांचं गुपित समजलं होतं आणि त्याला त्याची गंमत वाटली होती. 'मुंग्या काय कुणी ओरडेल म्हणून नाय काय रांगेत चालत. आपल्याला दिसतं... त्यांना वास येतो... म्हणून त्या एकमेकींच्या मागं लैनीनी जातात. तसं गेलं की त्यांना खाणं मिळतं. आपण कशाला उभं राहतो रांगेत? आपल्याला काय मिळतं?'

'आपल्यालापण तसं गेलं की खिचडी मिळते.'

परश्या म्हणाला, तसे तिघं खिक करून हसले.




'अरेऽ, पण खिचडी एकदाच मिळते.
इतक्या वेळा रांग कशाला करायची?'
अशा त्यांच्या कायकाय गप्पा चालू झाल्या...
एवढ्यात संकेतच्या पाठीवर सरांचा धपका बसला.
'गप उभं राहता येत नाही का रे?' सर रागावून संकेतला म्हणाले.
संकेतला राग आला, रागापेक्षाही तो जास्त दुखावला गेला. आत्ताच्या आत्ता घरी जाण्याच्या त्याच्या इच्छेनं डोकं वर काढलं. आता त्याला दुसरं काही दिसत नव्हतं. त्याला फक्त घरी जायचं होतं. या रांगेचा, सरांचा, सगळ्याचाच त्याला मनस्वी राग आला होता. त्याच्या आधीच्या शाळेत तो काही मार खाणारा विद्यार्थी नव्हता. जसं काही तो कोण आहे याचं काही या शाळेला पडलेलंच नव्हतं.


त्यानं मधली सुट्टी होईपर्यंत कसाबसा धीर धरला. त्याच्या मनात काहीतरी उफाळून येत होतं. मधली सुट्टी झाली आणि संकेतची स्वारी तडक शाळेबाहेर पडली. त्याला खिचडी नको होती. त्याऐवजी त्यानं चक्क शाळेच्या मागची पाऊलवाट धरली आणि डोंगर चढायला सुरुवात केली.

या डोंगराच्या पलीकडं त्याचं गाव होतं. डोंगर चढणं-उतरणं हे काही त्याला नवीन नव्हतं. झपझप पावलं टाकत तो निघाला. मधली सुट्टी संपल्याचे टोल त्याला ऐकायला आले, तेव्हा त्याचा निम्मा डोंगर चढूनसुद्धा झाला होता. टोल ऐकल्यावर तो क्षणभर अडखळला. त्यानं मागं वळून पाहिलं. इतस्ततः पसरलेली मुलं वर्गात चालली होती. तो शाळेत असता, तर तोही



असाच निमूट वर्गात शिरता... मग पुढचे चार तास परत ‘रांगेत बसा, बोलू नका, जागेवरून उठू नका.’ आपण बाहेर आहोत यानं त्याला बरं वाटलं. जांभळीच्या एका झाडाखाली तो बसला.





टपोऱ्या जांभळांचा सडा तिथं खाली पडलेला होता. पक्ष्यांनी उष्टावलेली जांभळं त्यानं मिटक्या मारत खायला सुरुवात केली. जीभ जांभळी होईपर्यंत त्यानं ती गोड जांभळं खाल्ली.

त्याचं जांभळं मटकावणं चालू असताना एक शेतकरी तिथं आला. संकेतच्या अंगावर शाळेचा गणवेश बघून त्यानं विचारलं, ‘का रे पोराऽ शाळेला नाही जायचं का?’

संकेत चपापला. मग सावरून म्हणाला, ‘नाही. आज लवकर घरी चाललोय. गावाला जायचंय.’

‘असं असं... मग इथं का थांबला?’ शेतकऱ्यानं साळसूदपणानं विचारलं.

‘हे असंच... जांभळं गोड हाईत.’

‘खरंय... खावा खावा...’ शेतकरी हसून म्हणाला.

दोघं जण जरा टेकले... तेव्हा संकेतच्या मनात काय आलं कुणास ठाऊक. त्यानं शेतकरीभाऊंना विचारलं, ‘सगळ्या झाडांना अशी

टपोरी गोड जांभळं का हो नसतील लागत?'

त्याचा प्रश्न ऐकून शेतकरी हसला. म्हणाला, 'अरेऽ असं कसं होईल?'

संकेतचे प्रश्न अजून संपले नव्हते.

'का नाही? मला असं खूप वाटतं, आंब्याच्या सगळ्या झाडांना हापूस, जांभळाच्या सगळ्या झाडांना अशी फक्त मोठी आणि गोड चवीची जांभळं असं का बरं नाही होणार? गावठी छोटी आणि तुरट चवीची फळं हवीतच कशाला?'

शेतकरी म्हणाला, 'तुझा प्रश्न नामी आहे गड्या, पण मी तरी काही आजवर असं बघितलेलं नाही. रानात सगळ्या प्रकारची झाडं, सगळ्या प्रकारची फळं असायचीच की. ती नसली, तर आपल्याला सगळ्या चवी कशा कळणार?'

'पण कशाला हव्यात सगळ्या चवी? हापूसच पाहिजे फक्त.'

'असं कसं होईल? आता बघ... यंदा हापूसवर रोग पडला. हापूस काय हाती लागला न्हाय. यंदा रायवळ बघ केवढा झालाय. सडा पडतोय नुसता आंब्यांचा. गावठी आंबे खाल्ले का न्हाई?'

क्षणभर थांबून संकेत म्हणाला, 'खाल्ले कीऽऽ खूप खाल्ले. दादा,

तुम्ही काय केलंय यंदा वावरात?'

'आपलं एकच खाचर हाये बाबा. भात करतोय. अजून काय करणार....' शेतकरीभाऊ म्हणाले.

'तुम्हीपण इंद्रायणी का? आमचंबी खाचर आहे. आम्हीपण इंद्रायणीच करतो.' संकेत म्हणाला, 'पण मला एक कळत न्हाई, मग आपण शेतात का बरं फक्त एकच जात घेतो? इंद्रायणी म्हणजे सगळा इंद्रायणी? थोडा इंद्रायणी, थोडा आंबेमोहोर, थोडी साळ असं का नाही? रानाचा नियम शेताला का नाही?'

संकेतचा प्रश्न ऐकून शेतकरीभाऊ कौतुकानं हसले, म्हणाले, 'या प्रश्नाचं उत्तर काही माझ्याजवळ नाही. एकेका भागाची आपली पद्धत आसती. या भागात सगळे इंद्रायणी करतात, म्हणून आपण इंद्रायणी करतो. दुसरं काय? चलऽ मला जाऊ दे. पाउस तोंडावर आहे. माझी कामं खोळंबल्यात.'

शेतकरीभाऊ गेले आणि संकेतपण उठून चालायला लागला. चालताना त्याला वाटलं की, आज आपल्याकडं दोन प्रश्न जमा झालेत. 'आपण रांगेत का चालतो?' हा एक प्रश्न आणि 'रानात असतं तसं शेतात का नसतं?' हा आणखी एक प्रश्न.

जसजसा तो वर जायला लागला, तसतशी खालची शाळा लहान लहान व्हायला लागली. संकेतला मोकळ्या वाऱ्यानं  बरं वाटत होतं. त्याचा शर्ट वाऱ्यानं फडफडत होता आणि त्याचा जीवसुद्धा त्या वाऱ्याबरोबर असाच स्वैर फडफडायला उत्सुक होता. मध्येच एका ओहोळाचा उगम त्याला दिसला. इतक्या दिवसांत पाऊस जेमतेमच झाला होता, पण तेवढ्यानं तिथं पाण्याची एक धार वाहायला सुरुवात झाली होती. संकेत तिथं थांबला आणि त्यानं त्या झुळझुळ पाण्याला हात लावला. त्यात ओंजळ धरून तो पाणी पिणार, एवढ्यात एक छोटा बेडूक टुणकन उडी मारून त्याच्या हातावर आला. ओंजळ मोडली. संकेतनं झटक्यानं हात मागं घेतले. बेडूकही भ्याला, तोही झटक्यात उडी मारून चिखलात जाऊन लपला. संकेतला हसू आलं.

पुन्हा एकदा हातांची ओंजळ करत तिनं पाणी पिऊन तो मार्गस्थ झाला. आता तो दमला होता. त्यानं माथा कसाबसा गाठला





आणि एका दगडावर बूड टेकलं. तिथून समोरचा सगळा परिसर काय छान दिसत होता! दोन डोंगरांमधल्या सोंडेवर तो उभा होता. त्याचं गाव एका बाजूला होतं आणि त्याची शाळा दुसऱ्या बाजूला. झरझर उतरला, तर त्याचं गाव तो अंधाराच्या आत गाठू शकणार होता, पण वर आल्यावर संकेतला वेगळंच काही वाटायला लागलं होतं. त्याचं ठरत नव्हतं. 'परत गेल्यावर वडील रागावले म्हणजे? परत मामाकडं धाडून दिलं म्हणजे? म्हणजे दोन्हीकडं बोंब. त्यापेक्षा मामाकडं उशिरानं का होईना गेलो, तर कुणाला काही कळणारही नाही. उशीर का झाला विचारलं तर देईन काहीतरी कारण सांगून.' संकेतनं विचार केला.

त्याचं दप्तर शाळेत होतं.

कदाचित परश्याच्या लक्षात येईल. येईल म्हंजे येईलच. पण दप्तर शाळेत राहील. परश्या घरी जायच्या आत त्याला गाठलं म्हणजे झालं.

एवढा विचार करून संकेत सावलीतल्या एका कातळावर आडवा झाला. दोन-पाच मिनिटं त्याला झोप लागली असेल नसेल.

त्याला एक स्वप्न पडलं. मगाशी हातावर आलेला बेडूक स्वप्नात चक्क त्याच्याशी बोलत होता.

'पावसाळा आला आहे हे तुम्हाला कसं समजतं?' आता तर संकेतही बेडकाशी बोलत होता, तेसुद्धा मराठीतून.


'नाही. असं काही खास पंचांग नाही आमच्याकडं. ढग गुरगुरतात नाऽऽ तो आवाज पडतो आमच्या कानांवर. मग येतो आम्ही बाहेर.' बेडूक गळा फुगवत म्हणाला.


'आणि मग? बाहेर आल्यावर? कुठला दिवस आहे, किती वाजलेत हे सगळं कसं ठरवायचं?'

'कशाला?' बेडकानं उलट प्रश्न विचारला.

'कशाला म्हणजे? वेळ कळायला नको? किती वाजलेत हे कळलं म्हणजे बरं असतं.'

'आमच्यात तसं नसतं. खरं सांगू का? कुणाच्यातच तसं नसतं. घड्याळ तयार करून तुम्ही





तुमची मोठी पंचाईत करून ठेवली आहे. आमच्यात असं असतं की, जो जास्त हालचाल करतो, त्याचा वेळ भरभर जातो आणि जो आरामात राहतो, त्याच्याकडं वेळ असतो. आमचं घड्याळ आम्ही झोपलो की बंद होतं. ते पुढच्या पावसाळ्याला चालू होतं. अधेमधे तास, मिनिटं असलं काही आम्ही बघत नाही. तू तुझंच बघ ना... तुझं घड्याळही अजबच आहे. शाळेत असतास तर तुझा वेळ अजिबात गेला नसता. इथं तू असा झोपलायस, तर

तुला लवकर वेळ जायला नकोय. हो ना?'


'होऽ रेऽऽ...' संकेत खिन्न होऊन म्हणाला.

'आपलं घड्याळ आपण शोधावं. तेवढंच खरं असतं. बाकी अगदी सेकंदा-सेकंदाचा विचार करतो कोण?'

त्यांचं हे संभाषण चाललंय, तोच संकेतच्या चेहऱ्यावर कुणीतरी पाणी शिंपडतंय असं त्याला वाटलं. तो झोपेतून जागा झाला. बघतो तर काय... पाउस पडायला लागला होता. बेडूक कुठंच नव्हता. आपलं स्वप्न आठवून त्याला हसायला आलं. त्याच्याकडं आणखी एक प्रश्न जमा झाला होता, 'आपलं घड्याळ कोणतं?'

आता परतीच्या वाटेला लागावं असं तो ठरवतच होता. शाळा सुटेपर्यंत कदाचित तो खाली पोहोचेलसुद्धा असं त्याला वाटलं, तेवढ्यात त्याला गायींच्या गळ्यातल्या घंटा ऐकायला आल्या. मागं गायींबरोबर त्यांचा गुराखीपण दिसला. त्याच्याशी बोलायला संकेत थांबला. तो गुराखी संकेतच्या गावाच्या बाजूनं वर आला असला तर?

रामराम दादा! संकेत त्याच्याकडे बघून म्हणाला.



'रामराम. काय रे पोराऽ एकटाच इकडं कसा आलास?' गुराख्यानं चौकशी केली. संकेत तयार होताच.

'आलो असाच. सरांनी ऑफ दिला तास.' संकेत चक्क खोटं बोलला. गुराख्यानं त्याच्याकडं पाहिलं, पण जास्त चौकशा केल्या नाहीत.



'असंऽ असंऽऽ पाउस येईल जोरात असं वाटलं होतं, पण नाई अजून जोर दिसत. तू जा लवकर खाली. कुठून आला? साखरी?'

'होऽ हा काय निघालोच आहे. तुम्ही कुठून आले?'

'मी पार लांबून आलोय. आमच्या इकडं चाऱ्याचा मोठा प्रश्न झालाय. वैरण नाई आणि महागाई अशी की, एक पेंढी ईस रुपयाला झालीये. काय परवडतंय का? म्हणून आलो... गवताच्या मागं आलो.'

संकेतला गंमत वाटली. त्याला वाटलं, थोड्या अंतरावर वीस रुपयाला पेंढी आहे आणि इकडं मात्र फुकट. मग गोष्टी फुकट असताना पैसे कमवायचेच का? गाय काही पैसे खाणार नाही.

तिला बापडीला गवत पाहिजे. आपल्याला दूध पाहिजे. सगळंच तर फुकट, जर असेल मुबलक गवत. मग पैसे कशाला बरं लागतात? पैसे नसले ना कमवायचे, तर या शाळेची कटकट संपून जाईल एकदाची...

गुराखी काठीवर रेलून त्याच्याकडं बघत होता.

'जा खाली आता. अंधारून आलंय. पळऽऽ' त्यानं संकेतला हाकललं.

संकेत निघाला. त्याच्या झोळीत अजून एक प्रश्न जमा झाला होता, 'पैसे मोठे का गवत मोठं?'





जातानाचा रस्ता उताराचा होता. संकेत दुडुदुडु धावत निघाला. आता रस्ता त्याच्या पायाखालचा होता. खाली जायला लागला, तशी शाळा पुन्हा नजरेच्या टप्प्यात आली त्याच्या. सरांच्या दुचाकी गाड्या बाहेर दिसत होत्या.

'म्हंजे शाळा सुटलेली नाही अजून. चला वाचलो.' त्याच्या मनात आलं.

मगाशी भेटलेला शेतकरी अजून त्याच्या शेतात काम करत होता. त्याच्या शेताच्या बांधावर वाढलेली आंब्याची झाडं एका ओळीत दिसत होती, शिस्तीत. त्याच्या खाचरातल्या सऱ्यापण तशाच दिसत होत्या. पट्टीनं रेघा मारल्यासारख्या आणि त्याउलट मागची जांभळाची झाडं दाटीवाटीनं उभी असल्यासारखी दिसत

होती. त्यात खाली छोटी पिल्लं उगवून आली होती. संकेत बघत होता. 'आपोआप उगवतं त्यात ओळी नसतात, रांगा नसतात. का?' प्रश्न क्रमांक पाच. त्याच्याकडं जमा झालेले प्रश्न त्यानं चक्क मोजले.

पहिला प्रश्न- आपण रांगेत का उभं राहतो?


दुसरा- रानात असतं तसं शेतात का नसतं?

तिसरा- आपलं घड्याळ कोणतं?

चवथा- पैसे मोठे का गवत मोठं?

पाचवा- आपोआप उगवतं, त्यात ओळी का नसतात?





संकेतला खाली जाताना बरं वाटत होतं. त्यानं आज त्याचं त्याचं काहीतरी केलं होतं. त्याला कुणी सांगणारं नव्हतं, कुणी वणारं नव्हतं. आज डोंगर चढण्या-उतरण्यानं त्याला फार फार बरं वाटलं होतं. घरी परत जावं असं शाळेतून निघताना त्याला खूप वाटत होतं, पण आत्ता त्याला त्याच्या छोटयाशा धाडसानं जास्त बरं वाटलं होतं. उत्साहात तो खाली उतरला. शाळेच्या अगदी जवळ असताना शाळा संपल्याची घंटा झाली. आता जरा कसोटीची वेळ होती.

चेहरा जास्त बिनबोभाट दिसला, तर कुणी काही विचारणार नाही. त्याला वाटलं. आता वर्गात जाऊन दप्तर घेणंही शक्य होतं. तसा तो वर्गात शिरलाही. त्याचं दप्तरही तिथंच होतं. परश्या वर्गातच होता. ‘काय लेकाऽऽ तू कुठं गेला होतास?’ संकेतला बघून परश्यानं विचारलं.

‘चल सांगतो. सरांना कळलं का?’ संकेतनं गडबडीनं विचारलं.

‘कळलं म्हणजे? तुला भेटायला बोलावलंय...’ परश्या म्हणाला. आता आली का पंचाईत?

सरांना न भेटता जाणं शक्यच नव्हतं. संकेत सरांसमोर जाऊन उभा राहिला. सरांनी त्याच्याकडं पाहिलं. आश्चर्य म्हणजे त्यांनी त्याला विचारलं, 'काय? घरची आठवण येते काय?'

सरांचा हा अनपेक्षित प्रश्न ऐकून संकेतला रडूच कोसळलं. कसाबसा मान खाली घालून तो तसाच उभा राहिला.

'अरेऽ मग सांगायचं. त्यात काय एवढं? सगळ्यांना येते. तू काय एकटाच आहेस होय बाहेरगावहून आलेला? विचारलं का तू सगळ्यांना... ते इथलेच आहेत का कुठले म्हणून?' सर बोलत होते. ते रागावले नव्हते.

'आता सांग कुठं गेला होता?'

'डोंगरावर. माळ आहे ना तिथं.' संकेत घाबरत म्हणाला.

'आणि काय केलं तिथे जाऊन?' संकेतला वाटलं, कसं सांगणार काय झालं ते सगळं? त्याचे ते पाच प्रश्न.

तेवढ्यात सरच म्हणाले, 'नाहीऽ थांब. असं नको. तू आज लिहून काढ घरी जाऊन. का गेलास, कुठं गेलास, काय विचार केलास आणि उद्या सगळ्या वर्गाला वाचून दाखव.'

'शिक्षा?' संकेतच्या मनात आलं.

‘शिक्षा समजू नकोस.’ सर पुढं म्हणाले, ‘लिही. मग आपण ऐकू या... इतरांनाही आवडेल. कदाचित ती पोरंसुद्धा बोलती होतील. काय? लिहिशील ना?’

हे ऐकून संकेतला खूप आनंद झाला. ही शिक्षा असती, तरी ती त्याला आवडणार होती. तो विचार करायला लागला.

‘काय काय लिहावं? आणि कसं?’

निबंधाला नाव काय द्यायचं हे मात्र त्यानं आधीच ठरवलं होतं. नाव होतं, ‘प्रश्नांचा दिवस.’

त्या दिवशीनंतर संकेत शाळेत चांगला रुळला. त्याच्या प्रश्नांनी त्याला रुळतं केलं.

*(संकेतच्या प्रश्नांना तुम्ही काय उत्तरं द्याल? उत्तरं शोधाल की गोष्ट म्हणून सोडून द्याल? की तुमचे प्रश्न शोधून काढाल?)*



# IAPAR

## इंटरनॅशनल असोसिएशन फॉर परफॉर्मिंग आर्ट्स अँड रिसर्च (आय.ए.पी.ए.आर.):

आयपार (आय.ए.पी.ए.आर.) ही प्रयोग कलांच्या विविध पैलूंकडे एकत्रितपणे पाहण्यासाठी निर्माण झालेली संस्था आहे. आयपारमध्ये कलाविषयक संशोधन, कलात्मक प्रयोग आणि कलेची जगण्यातील उपयोगिता या तिन्ही बाबतीत काम केले जाते. आंतरशाखीय दृष्टीकोन हा आयपारच्या विचारसरणीचा गाभा आहे. कलावंत, प्रशिक्षक आणि प्रयोगजीवी कलांचा उपयोग करून आपले आणि इतरांचे जगणे समृद्ध करणारे तज्ञ अशा सर्वांना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न आयपार करत असते. सर्वांगीण विकास साधण्यासाठी संवाद, चर्चा आणि परस्पर सहकार्य या माध्यमांमधून एकत्र येण्यासाठी आयपारचे व्यासपीठ नेहमीच उपलब्ध असते.

आनंदरंग हा आयपारचा लहान मुलांसाठी सुरू असलेला उपक्रम आहे.

www.iapar.org या संकेतस्थळावर आयपारविषयी अधिक माहिती मिळू शकेल.

# आनंदरंग

## मुलांसाठी गंमत, मजा, शिक्षण, आनंद!

आनंदरंग म्हणजे मुलांसाठी सुट्टीचं गाणं. सुट्टीत कसलं ओझं नसतं, नवं काही करून बघण्याची ऊर्मी असते, कधी गाणं म्हणून बघावसं वाटतं तर कधी डोंगरावर फिरायला जावं वाटतं. निवांतपणाची गोडी असली म्हणजे अवघड सुद्धा सोपं होऊन जातं. 'मला नाच अजिब्बात आवडत नाही' म्हणणारा तालात पावलं टाकू लागतो, आणि मला चित्र येतच नाही म्हणणारा कागदावर अक्षरशः ओणवा होऊन चित्र काढण्यात दंग होऊन जातो. आपल्याला आपले खेळणे तयार करता येते हे मुलं शिकतात, खेळण्यातून विज्ञानाचे नियम ती शिकतात. मुलांना हे सुट्टीचं गाणं फक्त सुट्टीच्या दिवशी नाही तर नेहेमी गाता यावं म्हणून आनंदरंग!



डॉ श्रीधर राजगुरू, अनिता राजगुरू, डॉ श्यामला वनारसे यांसारख्या बालकारणींच्या मार्गदर्शनाखाली आनंदरंगची जडणघडण झाली. आनंदरंग हा उपक्रम कामगारांच्या मुलांसाठी शिबिरांच्या रुपात मूळ सुरु झाला. तूर्तास आनंदरंग तर्फे अनेक उपक्रम राबवले जातात. यामधे मुलांसाठी रंगमंचाचरून केली जाणारी सकस सादरीकरणं, दिवाळी आणि उन्हाळी सुटीतील शिबिरं,शाळांबरोबर मजेचे तास असे अनेक उपक्रम चालतात.

संकेतला नवी शाळा अजिबात आवडली नव्हती. डोंगरापलीकडे त्याची आधीची शाळा होती, घर होतं, माणसं होती. त्याला तिकडची ओढ होती. एक छोटं निमित्त झालं आणि संकेत नव्या शाळेतून बाहेर पडून तडक डोंगराच्या दिशेनं चालू लागला. त्याच्या स्वतःच्या गावी जाण्यासाठी. पण झालं काय, की वाटेत त्याला पाच प्रश्न भेटले... आणि त्याचा रस्ताच बदलला! कोणते प्रश्न? आणि मग संकेतनं काय केलं? वाचूया, 'प्रश्नांचा दिवस' मधे.

